Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune Pimpri-Chinchwad Area

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

जा.क्र.झोपुप्रा./तांत्रिक ३ / ६५७ /२०२३

दिनांक : २०/०४/२०२३

२०० 24/8/2023

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)

<u>प्रस्तावना :</u>

१. मौजे दापोडी सि.स.नं. २८८७, (जगताप चाळ, गुलाबनगर झोपडपट्टी) क्षेत्रातील ५३१.३९ चौ.मी क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.भोसले तुपे डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२९/०८/२०२२ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. यासंदर्भात सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेल्या दि.०३/०९/२०२१ रोजीच्या अंतिम पात्रता यादीनुसार मिळकतीवरील एकूण झोपडीधारकां पैकी ७१.१८ टक्के झोपडीधारकांनी विकसक मे.भोसले तुपे डेव्हलपर्स यांना संमती दिलेली आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/६४८/२०२२ दि. ०४/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/८२८/२०२२ दि. ३०/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

इ) झोपडीधारकांची दि. ०३/०९/२०२१ रोजीची सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत केलेली अंतिम पात्रता यादी परिशिष्ट - २ दि. ०३/०९/२०२१ रोजी जागेवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि.१०/०२/२०२३ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये <u>"झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना"</u> सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना दिनांक ०९/०३/२०२३ रोजी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अ) सदर प्रकरणी प्राधिकरणाकडे सदर प्रारूप योजनेबाबत कोणतीही हरकती दाखल/ प्राप्त झालेली नाही.

४. सदर प्रारुप योजनेसंदर्भात प्राधिकरणामार्फ़त सदर क्षेत्रासंबंधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेस उक्त नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

६. सदर योजनेद्वारे विकसक मे.भोसले तुपे डेव्हलपर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

७. सदर योजनेचे विकसक मे.भोसले तुपे डेव्हलपर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरु करणे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळालेनंतर बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

८. सदर मिळकतीवरील झोपडीधारकांनी एकत्रित येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापित करणे अनिवार्य आहे. त्याबाबतचा रितसर अर्ज व आवश्यक ती सर्व कागदपत्रे प्राधिकरणातील सहकार विभागाकडे तात्काळ दाखल करणे आवश्यक राहील.

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २० / ०४ /२०२३

Slum Rehabilitation Authority, Technical Department, APPROVED, Pimpri Chinchwad Area

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
20.4.23

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   - सक्षम प्राधिकारी क्र.३
   - सहा. निबंधक सहकारी संस्था -सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   - संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी.
३. विकसक मे.भोसले तुपे डेव्हलपर्स, नोबेल हॉस्पिटल जवळ, हडपसर, पुणे.
४. दापोडी सि.स.नं. २८८७, जगताप चाळ, गुलाबनगर झोपडपट्टी येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी ---------- येथे उपलब्ध करून देण्यात येत आहे.
५. जमिनीचे भोगवटदार - जयश्री विजय जगताप व इतर ४.